VOL- VIII ISSUE- VIII AUGUST 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# निवड-आधारित श्रेयांक प्रणाली: गुण आणि मर्यादा

**प्रा.डॉ. शोभना वि. जोशी[१] प्रविण म. पाथरकर[२]**
[१]विभाग प्रमुख, शिक्षणशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
[२]पीएच.डी. संशोधक विद्यार्थी

**सारांश :**

*भारतीय शिक्षण व्यवस्था हि विविध स्वरूपाच्या गुंतागुंतांनी परिपूर्ण बनलेली क्लिष्ट व्यवस्था आहे. शिक्षणाच्या प्रत्येक स्तराची समस्या, गरज आणि अपेक्षा वेगळी आहे. तथापि, हि गुंतागुंत, क्लिष्टता कमी करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले गेले आहेत. विशेषतः भारतीय शिक्षण प्रणालीतील विसंगती दूर करण्यासाठी, त्यात गुणवत्ता व समानता सुनिश्चित करण्यासाठी वेळोवेळी विविध आयोग-समित्या स्थापन केल्या गेल्या आहेत. राष्ट्रीय पातळीवर गुणवत्ता हमी कक्षाची अंमलबजावणी देखील केलेली आहे. विशेषत: पदवी स्तरावर समानता आणण्यासाठी निवड-आधारित श्रेयांक पद्धती अनिवार्य करण्याचे निश्चित केले गेले आहे. परंतु भारतीय शिक्षणपद्धती वैविध्यपूर्ण आहे व या विविधतेतून निर्माण होणाऱ्या मूलभूत अडचणींचा विचार करून एकसमान मूल्यमापन प्रणाली अंमलात आणण्याची आवश्यकता आहे. भारतातील सध्याची शिक्षण व्यवस्था प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षण स्तरावर विस्तारलेली आहे. शिक्षण व्यवस्थेतील तिसरा स्तर म्हणजे उच्च शिक्षण यास राष्ट्राच्या विकासामध्ये खुप महत्व आहे. विविध प्रकारची संशोधने, नवनवीन शोध, सृजनशील कल्पना हे सर्व उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेवर आधारित आहेत.*

*परंतु सध्याच्या उच्च शिक्षणाची गुणवत्ता हि सर्वात मोठी चिंतेची बाब आहे. गुणवत्तेचे मूल्यमापन हे सार्वत्रिक स्तरावरील प्रणालीद्वारे होणे गरजेचे आहे. आणि हे सर्व निवड आधारित श्रेयांक पद्धतीच्या माध्यमातून शक्य झाले.*

**प्रस्तावना:**

राष्ट्र निर्मितीच्या प्रक्रियेत शिक्षणाची अत्यंत महत्वपूर्ण भूमिका आहे. सर्व प्रकारची संशोधने व नवकल्पना उच्च शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये घडतात म्हणुन शिक्षणाच्या सर्व स्तरापैकी उच्च शिक्षण हे किनात्याही राष्ट्राचा कणा मानला जातो. सध्या, संशोधन कार्याकडे बरेच लक्ष देण्यात येत असल्यामुळे उच्च शिक्षण पद्धतीमध्ये सुधारणा करणे आणि त्या शैक्षणिक कार्यक्षमता आणि उत्कृष्टतेच्या मार्गावर नेणे आवश्यक झाले आहे.

भारतात उच्च शिक्षण हे विद्यापीठे आणि महाविद्यालयांमधून मोठ्या प्रमाणात दिले जाते. बहुसंख्य विद्यापीठे आणि महाविद्यालये विशेषत: केंद्रीय विद्यापीठांनी उच्च शिक्षण अधिक सुसंगत करण्यासाठी सत्र प्रणाली स्वीकारली आहे. तथापि, 'संपूर्ण ज्ञान, कौशल्ये, मूल्ये, आत्मविश्वास आणि शैक्षणिक कार्यक्षमता यांचा मोठ्या प्रमाणात अभाव असलेल्या पदवीधरांची निर्मिती करणारी व्यवस्था' अशी भारतीय शिक्षण प्रणालीची सध्याची दयनीय परिस्थिती आहे. नाविन्यपुर्ण कल्पनांची निर्मिती करणारी, विद्यार्थी केंद्रित दृष्टीकोन विकसित करून जागतिक स्तरावर स्पर्धा करणारी मूल्यमापन प्रणाली असणे, अशा प्रकारच्या सुधारणांची व परिवर्तनाची भारतीय उच्च शिक्षणात आवश्यकता आहे.

नवीन शैक्षणिक धोरण तयार करण्यासाठी भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाने (एचआरडी) यासाठी आधीच पुढाकार घेतला आहे. भारतीय उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेचा विकास करण्यासाठी आणि ते जागतिक स्तराच्या तोडीसतोड

बनवण्यासाठी उच्च शिक्षणात सुधारणा घडवून आणणे हा त्यामागील मानस आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विकसित करण्याची आणि त्याची अंमलबजावणी करण्याची संपूर्ण जबाबदारी विद्यापीठ अनुदान आयोगाची आहे. शैक्षणिक विकास, उत्कृष्टता, निपक्षपातीपणा, शिक्षक आणि प्रशासकांच्या विविध स्तरांवर भरती करण्यासाठीचे निकष तयार करणे यासारखी विविध कामे विद्यापीठ अनुदान आयोगाकडून वेळोवेळी केली जातात. अभ्यासक्रम, अध्यापनशास्त्र , परीक्षा व मूल्यमापन प्रणाली यामध्ये नाविन्यपुर्ण सुधारणा करणे हे देखील विद्यापीठ अनुदान आयोगाचे महत्वपुर्ण काम आहे.

बहुतेक भारतीय विद्यापीठे आणि महाविद्यालये गुण किंवा टक्केवारीच्या आधारे मूल्यमापन करतात. जी विद्यार्थ्यांच्या अध्ययन गतिशीलतेसाठी अडथळा ठरतात आणि त्यामुळे त्यांना एका संस्थांमधून दुसऱ्या संस्थेत जाता येत नाही. वर्तमान व्यवस्था त्यांना आवडीचे विषय किंवा अभ्यासक्रम अभ्यासण्यासाठी एका संस्थेतून दुसऱ्या संस्थेमध्ये जाण्याची परवानगी देत नाही. यासारख्या सकारात्मक बाबी करण्यासाठी एक लवचिक प्रणाली असणे गरजेचे आहे. जेणेकरून विद्यार्थी त्यांच्या आवडीनुसार व इच्छेनुसार व्यावसायिक आणि अव्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेऊ शकतील.

म्हणूनच, शिक्षणतज्ज्ञ आणि शिक्षण क्षेत्रातील इतर तज्ञ यांच्यातील प्रदीर्घ चर्चेनंतर विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) अकराव्या पंचवार्षिक योजने अंतर्गत सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांना निवड आधारित श्रेयांक पद्धतीची अंमलबजावणी करणे बंधनकारक केले आहे. (केळकर, ए.एस. आणि रविशंकर, एल. २०१४) यांनी त्यांच्या अभ्यासामध्ये असे स्पष्ट केले की बऱ्याच विद्यापीठे / स्वायत्त संस्थांनी निवड आधारित श्रेयांक पद्धतीची अंमलबजावणी अगोदरच सुरु केलेली आहे. मुंबई विद्यापीठाने २०११ मध्येच निवड आधारित श्रेयांक पद्धतीचा अवलंब करण्यास सुरुवात केलेली आहे.

अशा प्रकारचे उपक्रमांची अंमलबजावणी करण्याचे विद्यापीठ अनुदान आयोगाची उद्दीष्टे :

1. उच्च शिक्षणात सुधारणांची आवश्यकता
2. अध्ययनार्थीचे आंतरविद्यापीठ स्थलांतर/हस्तांतरण
3. उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा
4. अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी अधिक लवचिकता
5. देशातील सर्व अभ्यासक्रमांचे उच्चीकरण करणे

निःसंशयपणे निवड आधारित श्रेयांक पद्धतीच्या अंमलबजावणीमुळे विद्यमान उच्च शिक्षण प्रणालीमध्ये एक नवीन अध्याय जोडला जाणार आहे.

ही मूल्यमापन प्रणाली --

१. विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार अभ्यासक्रम पुर्ण करण्याची संधी देते.

२. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मुलभूत विषयासोबतच इतर अभ्यासक्रमाचे अध्ययन करण्याच्या जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून देते.

३. दोन वेगवेगळ्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या मुलभूत विषयासह अतिरिक्त विषयाचे अध्ययन करण्याचे साधन म्हणून काम करते.

४. विद्यार्थ्यांना त्यांच्या मुलभूत विषयासह अतिरिक्त विषयाचे अध्ययन करण्याची संधी प्रदान करते.

५. एकाच वेळी सातत्यपूर्ण आणि सर्वंकष मूल्यमापन करण्यावर भर देते.

निवड आधारित श्रेयांक पद्धतीमध्ये अंतर्गत मूल्यमापनासाठी ४०% तर उर्वरित ६०% भारांश अंतिम परीक्षेसाठी आहे. अंतर्गत मूल्यमापनात २० गुणांची एक चाचणी, १० गुणांचा स्वाध्याय, वर्गातील सक्रीय सहभागासाठी ५ गुण तर उर्वरित ५ गुण हे विध्यार्थ्यांचे वर्गातील एकूण वर्तनासाठी देण्यात येतात.

**केळकर, ए.एस. आणि रविशंकर, एल. २०१४** यांनी निवड आधारित श्रेयांक पद्धतीच्या परिणामकारकतेच्या संदर्भात केलेल्या संशोधनातून असे दिसून आले आहे की-

1. निवड आधारित श्रेयांक पद्धतीचे उद्दीष्ट साध्य झाले आहे का?

   अ) ४२% शिक्षक सहमत.

   ब) ३९% शिक्षक असहमत.

   क) १८% शिक्षकांनी याबाबत उत्तर देण्यात असमर्थता दर्शवली.

2. निवड आधारित श्रेयांक पद्धती हि अध्यापन, मूल्यमापन कि दोन्हीवर भर देते.

   अ) २०% अध्यापनावर

   ब) ६२.५% मूल्यमापनावर

   क) १५% अध्यापन व मूल्यमापन या दोन्हीवर समान भर देते.

**रॉय, खानम आणि त्रिबेणी (२०१३) यांच्या अभ्यासाचे निष्कर्ष:** निवड आधारित श्रेयांक पद्धतीबाबत कला शाखेचे आणि विज्ञान शाखेचे मुले मुलींच्यापेक्षा उच्चस्तरिय सकारात्मक दृष्टीकोन ठेवतात.

**निवड आधारित श्रेयांक पद्धतीचे गुण :**

- शिक्षक केंद्रित शिक्षणाचे विद्यार्थी केंद्रित शिक्षणात परिवर्तन
- परीक्षेच्या दबावाला सामोरे जातानाच विद्यार्थी जास्तीत जास्त श्रेयांक मिळवू शकतात.
- विद्यार्थ्याला आपल्याच शाखेतील किंवा आंतरविद्याशाखेतील मुलभूत किंवा वैकल्पिक विषय निवडण्याची परवानगी आहे.
- विद्यार्थ्याला स्वत:च्या आवडीचे अभ्यासक्रम व विषय निवडण्यासाठी उपयुक्त आहे.
- एका संस्थेतुन दुसऱ्या संस्थेत जाऊन अभ्यासक्रम पुर्ण करण्यास प्रोत्साहन देते.
- ही जागतिक स्तरावरील शैक्षणिक प्रणाली आहे.
- हि प्रणाली विद्यार्थ्यांना त्यांच्या वेळेनुसार त्यांचे अभ्यासक्रम अभ्यासण्यास मदत करते.
- या प्रणालीच्या लवचिकतेमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमता जाणून घेण्यास मदत होते.
- या प्रणालीमुळे शिक्षण प्रणालीचा पाया व्यापक झाला आहे.
- या प्रणालीमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबरोबरच अष्टपैलू व्यक्तिमत्व निर्माण करण्यास प्रोत्साहन दिले जाऊ शकते.
- वैकल्पिक विषयांच्या माध्यमातुन वेगवेगळ्या अभ्यासक्रमांचे ज्ञान प्राप्त होत असल्याने ते रोजगारासाठी देखील उपयुक्त ठरू शकते.
- या प्रणालीमुळे विद्यार्थ्यांच्या डोक्यावरील ताण व अभ्यासाची चिंता कमी केली जाऊ शकते.
- या प्रणालीमुळे विद्यार्थ्याची कार्यक्षमतेमध्ये वृद्धी केली जाऊ शकते.
- या प्रणालीमुळे व्यावसायिक कौशल्यांचा विकास शक्य आहे.
- हि प्रणाली मूल्यमापनाच्या दृष्टीने शिक्षणपद्धतीत एकरूपता सुनिश्चित करण्यात मदत करते.
- हि प्रणाली परिसंवाद, सादरीकरण, स्वाध्याय, चर्चा, मुलाखती, प्रात्यक्षिक कार्य, प्रकल्प, क्षेत्रभेटी अशाप्रकारच्या विद्यार्थ्याच्या सक्रीय सहभागाच्या उपक्रमांवर आधारित शिक्षणावर भर देते.
- हि प्रणाली वर्गाध्यापनात माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करण्यावर भर देते.
- हि प्रणाली अंतर्गत मूल्यांकनाला महत्व देते.
- श्रेयांक निवडीमध्ये लवचिकता असल्या कारणाने मंद गतीने अध्ययन करणाऱ्या अध्ययनार्थीला त्याचा फायदा होऊ शकतो.
- या प्रणालीमध्ये श्रेणी देण्याची पद्धत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये समानता सुनिश्चित केली जाऊ शकते.
- या प्रणालीमध्ये एकाच वेळी भिन्न अभ्यासक्रमाचे अध्ययन करण्याची तरतुद आहे.

- विद्यार्थी त्याच्या अध्ययन क्षमतेनुसार शिक्षण किंवा अभ्यासक्रम पुर्ण करू शकतो.
- या प्रणालीमुळे प्रत्येकाने ज्याच्या त्याच्या क्षमतेनुसार अध्ययन प्रक्रियेमध्ये सहभागी व्हावे, अशा प्रकारचे अध्ययन अनुकूल वातावरणाची निर्मिती होते.
- या प्रणालीमुळे विद्यार्थ्यांमध्ये निकोप स्पर्धा व सहकार्य वृत्ती विकसित केली जाऊ शकते.
- या प्रणालीमुळे कार्याप्रती निष्ठा दृढ केली जाऊ शकते.

**निवड आधारित श्रेयांक पद्धतीच्या मर्यादा :**

- अचूक गुण मोजणे किंवा त्याची गणना करणे हे अत्यंत कठीण आहे.
- शिक्षकांचा कार्यभार मोठ्या प्रमाणात वाढेल.
- दैनंदिन शिक्षण प्रभावित होईल.
- विद्यार्थी एका संस्थेतुन दुसऱ्या संस्थेत वर्ग झाल्याने अनेक समस्या निर्माण होतील.
- मुख्य विषय आणि वैकल्पिक विषय यामध्ये सुसंगतता राखणे आव्हानात्मक असेल.
- एकाच वेळी वेगवेगळ्या अभ्यासक्रमाचे अध्ययन करणे आव्हानात्मक असेल.
- निवड आधारित श्रेयांक पद्धतीमध्ये श्रेयांक जमा करण्याच्या लवाचिकतेमुळे संस्थेवर कामाचा अतिरिक्त भार पडेल.
- संबंधित विषयावर प्रभुत्व संपादन करण्यात अडथळे निर्माण होतील.
- विद्यार्थ्याला अभ्यासक्रम व विषय निवडण्यास पुर्ण स्वातंत्र्यास जास्तीचे महत्व दिल्याने शिस्तीची समस्या निर्माण होईल.
- वेगवेगळ्या स्वरूपाच्या संस्था असल्याने विद्यार्थी स्थानांतराचे विविध प्रश्न निर्माण होतील.
- सातत्यपूर्ण किंवा अंतर्गत मूल्यमापन व मुल्यांकनावर जास्तीचा भर दिल्याने विद्यार्थ्यास अंतिम परीक्षेबाबत गांभीर्य राहणार नाही.
- वेगवेगळ्या प्रकारच्या अभ्यासक्रमाच्या व विषयाच्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिका तयार करण्यासाठी बहुतेक वेळेचा वापर होईल.
- विद्यार्थ्यांना निवासासाठीच्या पायाभूत सुविधा वाढवाव्या लागतील.
- विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे किंवा कार्यक्षमतेचे मूल्यांकन समान निकषावर करणे प्रतिभावान आणि बुद्धीवान विद्यार्थ्यांना निराश करेल.
- प्रश्नपत्रिका तयार करणे आणि परीक्षांची व्यवस्था करणे यातच शिक्षकांचा बहुतेक वेळेचा व्यय होत असल्याने संशोधनाच्या आणि नाविन्यपूर्ण कामात अडथळा निर्माण होईल.
- अंतर्गत मूल्यमापनाला ४०% भार असल्याने मूल्यमापनात व्यक्तिनिष्ठता येण्याची शक्यता जास्तीत जास्त असेल.

**सूचना / अभिप्राय**

- निवड आधारित श्रेयांक पद्धती विद्यार्थ्यांसाठी अनुकूल आहे. परंतु त्यातील कार्यक्षमता सिद्ध करण्यासाठी अद्याप अनेक गोष्टीची आवश्यक आहे.
- वर्ग अध्यापनाला महत्व दिले पाहिजे.
- निवड आधारित श्रेयांक पद्धतीचे गुण आणि मर्यादाबद्दल सविस्तर चर्चा करण्यासाठी परिषदा, चर्चासत्रे, कार्यशाळा इत्यादींचे आयोजन केले पाहिजे.
- या प्रणालीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिक्षकांना व्यावसायिक प्रशिक्षण दिले पाहिजे.
- टक्केवारी आणि श्रेणी या दोन्ही पद्धतींची तरतुद केली पाहिजे.
- हि प्रणाली अनिवार्य करण्याऐवजी पर्यायी किंवा निवड आधारित असावी.
- भारतात पदव्युत्तर महाविद्यालयांवर उच्च शिक्षणाची मोठ्या प्रमाणात जबाबदारी असल्याने सर्व पदव्युत्तर महाविद्यालये निवड

आधारित श्रेयांक पद्धतीच्या कक्षेत आणली पाहिजेत.

- सर्वत्र शैक्षणिक गुणवत्ता समान असली पाहिजे, जेणेकरुन विद्यार्थ्यांचे एका संस्थेमधून दुसऱ्या संस्थेमध्ये यशस्वी स्थानांतरण होऊ शकेल.
- विषयांची व श्रेयांकाची निवड संबंधित विभागाने किंवा संस्थेने करावी.
- निवड आधारित श्रेयांक पद्धतीची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षकांचे तर वैकल्पिक विषयांच्या निवडीसाठी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन व समुपदेशन करण्याची व्यवस्था करावी.
- केंद्र आणि राज्य विद्यापीठांमधील गुणवत्तेच्या व पायाभूत सुविधांच्या उपलब्धते संदर्भात असणारी असमानता दुर करावी.

**समारोप:**

भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेत मोठ्याप्रमाणात गुंतागुंत आहे. हि गुंतागुंत कमी करण्यासाठी तत्कालीन समस्यांवर मात करण्यासाठी तसेच गुणवत्ता विकसनासाठी सातत्याने प्रयत्न केले गेलेले आहेत. निवड आधारित श्रेयांक पद्धती हा त्याच प्रयत्नांचाच एक भाग आहे. संपूर्ण देशातील शिक्षण गुणवत्तापूर्ण व दर्जेदार बनविण्यासाठी आणि त्यामध्ये एकसमानता आणण्याच्या उद्देशाने विद्यापीठ अनुदान आयोगाने उच्च शिक्षणात निवड आधारित श्रेयांक पद्धतीची अंमलबजावणी करण्याचे निर्देश सर्व केंद्रीय, राज्य आणि अभिमत विद्यापीठांना दिलेले आहेत. त्यानुसार सरकारने आवश्यक मुलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या आणि शिक्षक, प्रशासक, व्यवस्थापक व या क्षेत्राशी संबंधित सर्व घटकांनी त्या निर्देशांची योग्य पद्धतीने अंमलबजावणी केली तर भारतीय शिक्षणात अमुलाग्र बदल होतील. आणि निवड आधारित श्रेयांक पद्धती एक मैलाचा दगड ठरेल. निवड आधारित श्रेयांक पद्धतीच्या गुणांचा सकारात्मक विचार केला तर त्यामध्ये असणाऱ्या दोषांवर-त्रुटींवर निश्चितच मात करता येईल.

**संदर्भ सूची:**


1. Draft Rashtriya Uchatar Shiksha Abhiyan (RUSA)-UGC published on the web on 21.1.2013:
2. http://www.ugc.ac.in/pdfnews/5867549_rusa .pdf.
3. Kelkar, A.S & Ravishankar, L. (2014). Choice Based Credit System: boon or bane. *Current Science,* Vol. 107 (8), pp. 1229-1230.
4. Roy,N.R., Khanam, U.K. & Devi, T. (2013). Attitude Towards Choice Based Credit System of PG levein Higher Education: A Study on Assam University. Scholarly *Research Journal for Interdiscipilinary Studies,* Vol. 1, pp. 11.98-1208.
5. U.G.C. Guidelines on Adaptation of Choice Based Credit System. University Grants Commission Bahadurshah Zafar Marg New Delhi. 110 002.
6. UGC (2008). From Chairman on Examination Reforms. D.O. No. F.1-2/2008(XI Plan), dated Jan 31, 2008: Annexure-II, Action Plan for Academic and Administrative Reforms.
7. UGC (2008) From Chairman, D.O. No.F.1-2/2008 (XI Plan). On Examination Reforms dated March 2009.